# <u>प्रेसनोट</u>

दि. ०३/०८/२०२२

## पिंपरी चिंचवड महानगरपालिकेतील नगर रचना व विकास विभागातील लोकसेवकावर (सर्व्हेअर)लाच मागणी प्रकरणी कारवाई.

---

| लाचलुचपत प्रतिबंधक विभाग/घटक | पुणे घटक |
|---|---|
| गुन्हा नोंद क्रमांक | पिंपरी पोलीस स्टेशन, पिंपरी चिंचवड पोलीस आयुक्तालय. गु.र.नं. ६३९/२०२२ |
| कलम | भ्रष्टाचार प्रतिबंध अधिनियम कलम - ७ |
| तक्रारदार | पुरूष, वय - ३८ वर्षे |
| आरोपीचे नाव व कार्यालय | लोकसेवक - संदिप फकिरा लबडे, सर्व्हेअर, वय - ४८ वर्षे<br>नेमणूक - नगर रचना व विकास विभाग, पिंपरी चिंचवड म.न.पा. अटक करण्यात आलेली आहे. |
| मागणी केलेली लाचेची रक्कम | ३,००,००० रू. (तीन लाख रूपये) |

पडताळणी दिनांक :- २८/०३/२०२२, २९/०३/२०२२, ३०/०३/२०२२, ०१/०७/२०२२ व १९/०७/२०२२
गुन्हा दाखल दिनांक :- ०३/०८/२०२२

थोडक्यात माहिती :- यातील तक्रारदार काम करत असलेल्या कंपनीचे विकास योजनेचा अभिप्राय (डी.पी. ओपिनियन) देण्यासाठी सर्व्हेअर संदिप लबडे यानी साडे तीन लाख रूपये लाच मागणी केल्याची तक्रार ला.प्र.वि. पुणे येथे दिली होती.

सदर तक्रारीची पडताळणी केली असता तक्रारदार काम करत असलेल्या कंपनीचे विकास योजनेचा अभिप्राय (डी.पी. ओपिनियन) देण्यासाठी सर्व्हेअर संदिप लबडे यानी प्रथम ३,५०,०००/- रू.ची व तडजोडीअंती ३ लाख रूपयांची लाच मागणी केली म्हणून वरिलप्रमाणे लाच मागणीचा गुन्हा नोंद करण्यात आला आहे.

ला.प्र.वि. पुणे युनिटच्या पोलीस उप अधीक्षक क्रांती पवार तपास करत आहेत.

सदरची कारवाई मा.पोलीस उप आयुक्त/पोलीस अधीक्षक श्री. राजेश बनसोडे, ला.प्र.वि. पुणे परिक्षेत्र, मा. अपर पोलीस अधीक्षक श्री. सुरज गुरव, ला.प्र.वि. पुणे यांचे मार्गदर्शनाखाली पुणे लाचलुचपत प्रतिबंधक विभागाने केली.

शासकीय अधिकारी, कर्मचारी / लोकसेवकाने लाचेची मागणी केल्यास त्याबाबत लाचलुचपत प्रतिबंधक विभाग पुणे कार्यालयास खालील नमुद क्रमांकवर सपंर्क साधण्याचे आवाहन श्री. राजेश बनसोडे, पोलीस अधीक्षक लाचलुचपत प्रतिबंधक विभाग, पुणे यांनी केले आहे.

१. <u>हेल्पलाईन टोल फ्री क्रमांक १०६४</u>
२. ॲन्टी करप्शन ब्युरो, पुणे - दुरध्वनी क्रमांक - ०२० - २६१२२१३४, २६१३२८०२, २६०५०४२३
३. व्हॉट्स-ॲप क्रमांक पुणे - ७८७५३३३३३३
४. व्हॉट्स-ॲप क्रमांक मुंबई - ९९३०९९७७००
५. ई-मेलआयडी - पुणे **dyspacbpune@mahapolice.gov.in**
६. वेबसाईट - **www.acbmaharashtra.gov.in**
७. ऑनलाईन ॲप तक्रार - **www.acbmaharashtra.net.in**

(श्रीहरी पाटील)
सहायक पोलीस आयुक्त/पोलीस उप-अधीक्षक (प्रशासन)
लाचलुचपत प्रतिबंधक विभाग पुणे.